जा.क्र.पोसआ/नि/८१९६/२०१९
पोलीस सह आयुक्त, पुणे शहर
यांचे कार्यालय, दिनांक :- २६/०९/२०१९

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता (सी.आर.पी.सी.) १९७३ चे कलम १४४** प्रमाणे आदेश.

आदेश

**ज्याअर्थी, विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०१९ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दिनांक २१/०९/२०१९ प्रसिध्दी पत्रकान्वये घोषित केला आहे. त्यानुसार महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदार संघामध्ये ही निवडणूक घेतली जाणार आहे. दिनांक २१/०९/२०१९ रोजी पासून आचारसंहिता लागू करण्यात आली असून दिनांक २१/१०/२०१९ रोजी मतदान व दिनांक २४/१०/२०१९ रोजी मतमोजणी होणार आहे. पुणे पोलीस आयुक्तालयामध्ये १० विधानसभा मतदार संघाचा समावेश असून खालील नमूद १० विधानसभा मतदार संघासाठी दिनांक २७/०९/२०१९ ते दिनांक ०७/१०/२०१९ रोजी पर्यंत निवडणूक प्रक्रियेचे कामकाज (नामनिर्देशन पत्र दाखल करणे, नामनिर्देशन पत्राची छाननी करणे व नामनिर्देशन पत्र मागे घेणे इत्यादी कामे) विधानसभा मतदार संघ निहाय खालील नमूद ठिकाणी चालणार आहे.**

| **अ.क्र** | **विधानसभा मतदार संघ क्र. व नाव** | **ठिकाण** |
|---|---|---|
| १. | २०८ वडगावशेरी | क्षेत्रीय कार्यालय, येरवडा, पुणे |
| २. | २०९ शिवाजीनगर | पंडित जवाहरलाल नेहरु, सांस्कृतिक भवन, घोले रोड, पुणे |
| ३. | २१० कोथरुड | जुने कर्वे रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे |
| ४. | २१२ पर्वती | सणस ग्राऊंड मनपा इमारत, सारस बागे जवळ, पुणे |
| ५. | २१३ हडपसर | साधना विदयालय, हडपसर, पुणे |
| ६. | २१४ पुणे कॅन्टोंन्मेंट | उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. ५, पुणे |
| ७. | २१५ कसबा पेठ | गणेश कला क्रिडामंच, नेहरु स्टेडियम, स्वारगेट, पुणे |
| ८. | २११ खडकवासला | तहसीलदार कार्यालय, हवेली, पुणे |
| ९. | २०३ भोर (अंशतः) | तहसीलदार कार्यालय, पुरंदर |
| १०. | २०२ पुरंदर (अंशतः) | तहसीलदार कार्यालय, भोर |

**सदरचे कामकाज सुरळीतपणे व शांततेत पार पाडण्यासाठी व पुणे पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कायदा व सुव्यवस्था राखणे कामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व उपद्रव टाळण्यासाठी वरील नमूद ठिकाणांचे २०० मीटर परिसरात निर्बंध घालणे जरूरीचे आहे, अशी माझी खात्री झालेली आहे.**

त्याअर्थी मी डॉ. रवींद्र शिसवे, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, वरील नमूद ठिकाणांच्या २०० मीटर परिक्षेत्रात दिनांक २७/०९/२०१९ चे ००.०१ वा. पासून ते दिनांक ०७/१०/२०१९ चे २४.०० वा. पर्यंत खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) उमेदवारी नामनिर्देशन पत्र दाखल करताना वरील ठिकाणी उमेदवारासोबत ०४ पदाधिकारी किंवा सुचक / कार्यकर्ते यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीस आत जाण्यास मनाई करण्यात येत आहे.

२) वरील ठिकाणी कोणताही प्रचार करण्यास, सभा घेण्यास व कोणतीही घोषणाबाजी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

३) वरील ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करण्यास मनाई करण्यात येत आहे.

४) वरील ठिकाणी कोणताही मजकूर लिहिण्यास अगर छापील मजकूर चिटकविण्यास मनाई करण्यात येत आहे.

५) वरील ठिकाणी नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी जात असताना निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयापासून १०० मिटरचे आत ३ वाहने घेऊन जाण्यास परवानगी आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दिनांक २६/०९/२०१९ रोजी दिला आहे.

ठिकाण :- पुणे शहर

**(डॉ. रवींद्र शिसवे)**
पोलीस सह आयुक्त,
पुणे शहर

दिनांक :- २६/०९/२०१९